# फळसेवाडी हितकारी संस्था
## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 16 जानेवारी 2005
**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 16. श्री रजंन रावजी म्हसकर |
| 2. श्री उदय भगवान राने | 17. श्री भरत गणपत राणे |
| 3. श्री मनोहर भिकाजी राणे | 18. श्री सुधिर भाबल |
| 4. श्री मधुकर संभाजी राणे | 19. श्री उत्तम वामन राणे |
| 5. श्री मधुसुदन श्रीधर राणे | 20. श्री रत्नकांत बालशिवाजी राणे |
| 6. श्री विनोद विठोबा राणे | 21. श्री अविनाश बाळकृष्ण राणे |
| 7. श्री प्रविण प्रताप राणे | 22. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 8. श्री शशिकांत वसंत राणे | 23. श्री प्रभाकर श्रीधर राणे |
| 9. श्री विश्वास ज्ञानदेव राणे (बंडू राणे) | 24. श्री श्रीकांत राणे |
| 10. श्री हेमंतकुमार रमेश राणे | 25. श्री लवू शिवाजी राणे |
| 11. श्री जयवंत नाना राणे | 26. श्री रविन्द्र शिवाजी राणे |
| 12. श्री सुनिल विनायक राणे | 27. श्री सत्यवान सावंत |
| 13. श्री गुरुनाथ गणपत राणे | 28. श्री सुरेश दत्ताराम राणे |
| 14. श्री शंकर बाळकृष्ण राणे | 29. श्री पांडूरंग सावजी राणे |
| 15. श्री मंगेश मनोहर राणे | 30. श्री अनिल सदानंद राणे |

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 16 जानेवारी 2005 रोजी संस्थेचे सभासद श्री मंगेश मनोहर राणे यांच्या घरी (14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053) संपन्न झाली. सभेस एकूण 30 सभासद उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष श्री मनोहर भिकाजी राणे व उपाध्यक्ष श्री मधुकर संभाजी राणे हे सभेच्या खुर्चीत विराजमान झाल्यावर सभेस सुरवात झाली. विषय पत्रिकेवरील विषयांस सुरवात करण्यापूर्वी आपल्या वाडीतील स्वर्गवासी झालेले कै मारुती त्रिंबक राणे, कै भगवान रामचंद्र साटम तसेच त्सुनामी लाटांमुळे मृत्युमुखी पडलेले केरळ, तामिळनाडूमधील लोक आणि भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय नरसिंहराव यांनाही दोन मिनीटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

1. विषय पत्रिके विषय क्रमांक 1 नुसार दिनांक 2 नोव्हेंबर 2003 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त चिटणीसांनी सभाग्रहास वाचून दाखविले व ते मंजूर करण्यात आले.

2. विषय पत्रिकेवरील विषय क्रमांक 2 नुसार संस्थेने मागील कालावधीत केलेल्या कामाची यादी वाचून दाखविली व पुढील कामे बाकी आहेत त्याबद्दल माहिती दिली व सर्वच सभासदांनी याबाबतीत लक्ष घालणे आवश्यक आहे असे सुचविले.
    a. फळसेवाडी ते पिसेकामते गावास जोडणारा रस्ता,
    b. वाडीतील पाऊलवाटा दुरुस्त करणे
    c. बिडवाडी हुंबरणेवाडी ते पिसेकामते (लिंगेश्वर मंदिर) पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे
    d. ब्राह्मण विहीर दुरुस्ती
    e. नळपाणी योजना – पाईपलाईन दुरुस्ती

याबाबातीत माननिय  नामदार व विरोधी पक्षनेते श्री नारायणराव तातू राणे व माननिय खासदार श्री सुरेश प्रभु यांच्याशी सतत पत्रव्यवहार चालू आहे असे चिटणीसांनी सांगितले. या सर्व विषयांवर चर्चा करण्यात आली व अध्यक्षांनी सर्वांनी या गोष्टींवर एकोप्याने काम करण्याची सभाग्रहास विनंती केली. वाडीतील काही धार्मिक कामे पूरी करण्याची विनंती केली.

3. नविन पदाधिकारी निवडणे
   पुढील पदाधिकारयांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

| **पदाधिकारयांचे नाव - पद** | **सुचक** | **अनुमोदक** |
|---|---|---|
| श्री मंगेश मनोहर राणे – अध्यक्ष | श्री अशोक दत्ताराम राणे | श्री विनोद विठोबा राणे |
| श्री पांडूरंग सावजी राणे – उपाध्यक्ष | श्री मधुकर संभाजी राणे | श्री रंजन रावजी म्हसकर |
| श्री सुनिल सदानंद राणे – सचिव | श्री पांडूरंग सावजी राणे | श्री रंजन रावजी म्हसकर |
| श्री अशोक दत्ताराम राणे – उपसचिव | श्री प्रभाकर श्रीधर राणे | श्री उदय भगवान राणे |
| श्री रत्नाकर बालशिवाजी राणे – खजिनदार | श्री अनिल सदानंद राणे | श्री प्रभाकर श्रीधर राणे |
| श्री उदय भगवान राणे – उपखजिनदार | श्री अशोक दत्ताराम राणे | श्री हेमंतकुमार रमेश राणे |

| | |
|---|---|
| कार्यकारीणी सदस्य | श्री रंजन रावजी म्हसकर, श्री हेमंतकुमार रमेश राणे,<br>श्री भरत गणपत राणे, श्री उत्तम वामन राणे, श्री दिलिप मधुकर राणे,<br>श्री शंकर बाळकृष्ण राणे, श्री जयवंत नाना राणे |
| अंर्तगत हिशेब तपासणीस | श्री सुरेश दत्ताराम राणे |

4. मागिल 2003 सालापर्यंतच्या थकबाकी वर्गणीबद्दल चर्चा करण्यात आली. यावर खजिनदार श्री उदय भगवान राणे यांनी सन 1997 ते 2004 पर्यंत सभासद वर्गणी बाकी आहे असे सांगितले व खजिनदार यांच्या हाती रु.6413/- वर्गणी बाकी असून संस्थेचे दहा वर्षाचे ऑडीट बाकी आहे असे सांगितले. सर्वसाधारण दहा वर्षाचे ऑडीट पूर्ण करण्यासाठी वार्षिक रु.500/- प्रमाणे रु.5000/- खर्च आहे असे सांगितले. या विषयावर अत्यंत गार्भीयाने चर्चा झाली व या खर्चास सर्व सभासदांनी मंजूरी देऊन मागील थकबाकी वसुल करण्यासाठी पूर्वीच ठरल्याप्रमाणे कुटूंबियांनी जबाबदारी घेऊन वसुल करुन देण्यासाठी आवाहन केले. तसेच या वर्गणीसोबत

सर्व सभासदांचे फार्म भरून घेण्याचे ठरले. हे फार्म श्री हेमंतकुमार रमेश राणे यांनी प्रिंन्ट करुन घेण्याची जबाबदारी घेतली.

मागील वर्गणी वसुल झाल्यावर सर्व हिशेबाची ताळेबंदी करावी व नंतर नवीन कार्यकारीणीस पदभार द्यावा असे ठरले. संस्थेचे खजिनदार श्री उदय भगवान राणे यांनी आपण या कामी अजून जास्त पुढाकार घेऊन काम करू अशी ग्वाही दिली. तसेचे यापुढे कॅश खजिनदारांच्या हाती न ठेवता पुढील कालावधीत बँक अकाऊन्ट उघडून पुढील व्यवस्थित अकाऊन्ट चालवावे असे ठरले.

श्री मनोहर भिकाजी राणे यांनी रु.301/- भरून आजीव सभासदत्व स्विकारले.

5. सन 1997-98 साली पाच सभासदांनी रु.1000/- आजीव सभासद म्हणून वर्गणी दिली होती अश्या बाबतीत काय करायचे असा प्रश्न होता, याबाबतीत या सभासदांना संस्थेने असे आवाहन केले की सन 2005 पर्यत त्यांची वर्गणी या रु.1000/- मधून घ्यावी व बाकी जमा संस्थकडे देणगी म्हणून जमा करावे असे ठरले व यावर चर्चा होऊन या गोष्टीस मंजूरी मिळाली.

6. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय
   श्री सत्यवान सावंत यानी गावी नळपाणी योजनेव्दारे मिळणारे पाणी घरात आजारी व्यक्ती असल्यामुळे पाईपव्दारे घेण्याच्या परवानगीसाठी सभाग्रहास विनंती केली. परंतू या विषयावर वाडीतील गावी राहणारे ग्रामस्थ व मुंबई रहिवाशी ग्रामस्थ यांची याबाबतीत पूर्वीच चर्चा झाली असून असे पाईपव्दारे पाणी घेता येणार नाही. आपण नळपाणी योजनेचा लाभ घ्यावा असे सांगण्यात आले.

   श्री मधुसुदन श्रीधर राणे यांनी श्री माता विठलादेवीच्या मंदिरासाठी आपण देणगी द्यावी अशी विनंती केली व या ग्रामसोहळ्यास मे महिण्यामध्ये ग्रामस्थांनी यावे असे आवाहन केले

यानंतर अध्यक्षांनी सर्व उपस्थि सभासदांचे आभार मानले. नविन कार्यकारीणीचे मन:पूर्वक स्वागत करून पुढील संस्थेची वाटचाल सुकर करावी असे सुचविले. तसेच या सभेसाठी श्री मंगेश मनोहर राणे कुटूंबियांनी चहापाणी व तिळगुळ यांची व्यवस्था केली त्याबद्दल त्यांचे आभार मानले.

संस्थेमार्फत देखिल तिळगूळ देण्यात आला व ही सभा रात्रौ 8:00 वाजता समाप्त झाली.

---